**कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांचेतर्फे वीज कायदा कलम ६२ (१) (अ) आणि ८६ १ (इ) अंतर्गत वीज निर्मिती प्रकल्पापासून निर्माण होणारी वीज राज्यातील ऊर्जा वितरण परवाना धारक कंपन्यांना विकण्यासाठी दर निश्चित करण्यासंबंधी माननीय महाराष्ट्र विदयुत नियामक आयोगास केलेल्या विनंती अर्जाचा गोषवारा (Case No. 87 of 2015)**

कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लि. या कंपनीची स्थापना एक विशेष कंपनी म्हणून कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील कच–याचे व्यवस्थापन करण्यासाठी त्यांचे प्रमोटर मे. सुनील हायटेक इंजीनीअर्स लि. आणि मे. सुनील हायटेक इंडिया इन्फ्रा प्रा. लि. यांचेतर्फे करण्यात आली. मे. रोकेम सेपरेशन सिस्टीमस् प्रा. लि., मुंबई या कंपनीची कच–याचे व्यवस्थापन व त्याव्दारे ऊर्जा निर्मिती करण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया पार पाडून निवड करण्यात आली होती.

वरील अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत १.८ मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प अस्थापित करण्यासाठी कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लि. या कंपनीस मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्पासाठी कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कसबा बावडा गावाजवळची चार हेक्टर जमीन ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यात आली आहे. याअनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिका व कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांचे दरम्यान कन्सेशनल अॅग्रीमेंट करण्यात आले आहे. सदरचा प्रकल्प हा Combustion या तंत्रज्ञानावर आधारित आहे. सदरील तंत्रज्ञानास अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत मंत्रालय, नवी दिल्ली यांनी कच–यापासून वीज निर्मिती करण्यासाठी मान्यता दिली आहे. वरील कन्सेशनल अॅग्रीमेंट प्रमाणे कोल्हापूर महानगरपालिका प्रकल्पाचे ठिकाणी १८० टन प्रतीदिन कचरा कंपनीस पुरविणार आहे व त्याव्दारे कंपनीतर्फे १.८ मेगावॅट एवढी वीज निर्मिती करण्यात येणार आहे. कच–याचे व्यवस्थापनेसाठी कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे कंपनीस रु. ३०८ प्रतिटन एवढी टीपींग फि ३० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येणार आहे. सदरील कंपनीने प्रकल्पामधून कच–याच्या ज्वलनामुळे होणारे प्रदुषण टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतलेली आहे. या

प्रकल्पामुळे कच–याची सुरक्षीत विल्हेवाट होण्यासोबत वीज निर्मितीही होणार आहे. या ठिकाणी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

कोल्हापूर ग्रीन एनर्जी प्रा. लि. या कंपनीने विद्युत अधिसुचना २००३ मधील कलम ६२ (१) (अ) व ८६ १ (इ) अंतर्गत प्रकल्पामधून निर्माण होणारी राज्यातील वीज ऊर्जा वितरण परवाना धारक कंपनीला विक्रि करण्यासाठी व त्याचा विदयुत दर ठरविण्यासाठी मा. महाराष्ट्र विदयुत नियामक आयोगास विनंती केली आहे. याबाबत सर्व प्राथमिक, तांत्रिक चर्चा आयोजीत करण्यात आल्यानंतर दिनांक १३ मे, २०१६ रोजी मा. आयोगाने सदरचा विनंती अर्ज दाखल करुन या संदर्भात जाहिर सुनावणी घेण्याचे सुचीत केले आहे. सदर अर्जामध्ये खालीलप्रमाणे विनंती करण्यात आली आहे.

१) प्रस्तावित कच–यापासून वीज निर्मितीचा प्रस्तावित दर मंजूर करुन प्रकल्पातून तयार होणारी वीज त्या दराने ऊर्जा वितरण परवाना धारक कंपनीला विक्रि करण्यास मंजूरी दयावी, तसेच प्रस्तावित दर पुढील २० वर्षासाठी निश्चित करावा. मा. आयोगाने ऊर्जा वितरण परवाना धारक कंपनीला सदरील वीज निर्मिती कंपनीसोबत ठरलेल्या दराने पीपीए करण्यास सुचना दयावी.

२) प्रकल्पातून निर्माण होणारी वीज रु. ७.४४ प्रती युनीट या दराने ऊर्जा वितरण परवाना धारक कंपनीस विक्रि करण्यास मान्यता दयावी. सदर अर्जामध्ये काही तांत्रीक कमतरता असल्यास अथवा त्यामध्ये अधिक माहिती अंतर्भूत करण्यास तसेच भविष्यात आवश्यकतेनुसार माहिती सादर करण्यास परवानगी देण्यात यावी.